


UNITE FOR GOOD

# अजिंठा

डिसेंबर- २०२५ ● अंक- ६ वा

|  |  |  |  |  |
| --- | --- | --- | --- | --- |
| आर.आय.प्रेसिडेंट<br>रो.फ्रान्सिस्को अरेइझो | डिस्ट्रीक्ट गव्हर्नर<br>रो.ज्ञानेश्वर शेवाळे | प्रेसीडेंट<br>रो.गिरीश कुलकर्णी | ऑन.सेक्रेटरी<br>रो.सुभाष अमळनेरकर | बुले.कमिटी चेअरमन<br>रो.कॅ.मोहन कुलकर्णी |

Rotary | UNITE FOR GOOD
ROTARY CLUB JALGAON
R. I. Dist. 3030 | Club No. 15512 | RIY : 2025-26
Estd. 6th February 1950

## संपादकीय...

नमस्कार, रोटरी प्रणाम, जय हिंद...

प्रिय सदस्य हो,डिसेंबर महिन्याचा 'अजिंठा' आपणास सादर करतांना खूप आनंद होत आहे. आपला या वर्षाचा हा ६ वा अंक. बघता बघता निम्मे वर्ष संपले सुद्धा. पण आपल्या सगळ्यांच्या आनंदाची गोष्ट म्हणजे आपल्या क्लबच्या प्रथेनुसार यावर्षी सुद्धा आपण वेगवेगळे प्रोजेक्टस् करून, साप्ताहिक सभांना वेगवेगळे, नामांकित व्याख्याते बोलवून या सगळ्या कार्याची उच्चतम पातळी गाठली आहे. अर्थात आपले अध्यक्ष याचे सारे श्रेय आपणा सर्व सदस्यांनाच देत आहेत. परंतु त्यांची Leadership आणि Commitment यातून प्रखरतेने दिसून येते. इलिनॉर रुझवेल्ट, अमेरिकेचे प्रख्यात भूतपूर्व अध्यक्षांची पत्नी यांनी लीडरची अतिशय समर्पक व्याख्या केली आहे, "A Good Leader inspires people to have confidence in the Leader; a Great Leader inspires people to have confidence in themselves."

आपला धानोरा येथील मेडीकल कॅम्प, बॉक्स क्रिकेट स्पर्धा, कायदेविषयक पथनाट्य, 'उडान' दिव्यांग पुनर्वसन केंद्रातील मुलांसाठी गीतबहार चा कार्यक्रम, CPR अवेअरनेस, व वंदे मातरम सार्ध शति निमित्त घेतलेला साप्ताहिक सभेतील कार्यक्रम असे अनेक उपक्रम याची ग्वाही देतील आणि यातच आपल्या क्लबचे एक चांगले वातावरण आपल्या सगळ्यांना समाधान देऊन जाते. या महिन्यात आपण क्लबतर्फे ५० गरीब नागरिकांचे डोळ्याचे मोतीबिंदूचे ऑपरेशन केले आहे. या अंकात डिसेंबर महिना डिसीज् प्रिव्हेंशन ॲन्ड ट्रिटमेंट वरती फोकस असल्याने त्याबाबत पी.पी.रो.डॉ.प्रदीप जोशी यांचा लेख आपणास नक्कीच आवडेल. इतरही नेहमीची सदरे आपणास आवडतील ही खात्री आहे.

**– रो.कॅप्टन मोहन कुलकर्णी**

## अध्यक्षीय मनोगत...

प्रिय रोटरी मित्रांनो, रोटरी प्रणाम !

नोव्हेंबर महिन्यात आपल्या क्लबने सेवा, समर्पण आणि संघभावनेचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले. धानोरा येथे आयोजित केलेल्या विनामूल्य वैद्यकीय तपासणी शिबिरात तब्बल ७०० रुग्णांची तपासणी, २१ डॉक्टरांची समर्पित टीम, २४ रोटेरियन यांचा सक्रीय सहभाग आणि स्थानिक आरसीसी व इंटरॅक्ट क्लबचे अनुकरणीय सहकार्य या सर्व घटकांमुळे उपक्रम अत्यंत परिणामकारक ठरला. शिबिरानंतर जवळपास ५० रुग्णांच्या कॅटरॅक्ट शस्त्रक्रिया नि:शुल्क करण्यात आल्यात, ही आपल्या कार्याची खरी फलश्रुती आहे.

तसेच, ऑक्टोबर–नोव्हेंबर महिन्यात इंटरॅक्ट वीकमधील विविध स्पर्धा, वाचन कट्टा, सीपीआर जनजागृती व्याख्यान, लिगल कमिटीमार्फत घरगुती हिंसाचार, पोक्सो व ज्येष्ठ नागरिक संरक्षण या विषयांवरील पथनाट्य, वंदे मातरम् कार्यक्रम, फाऊंडेशन मीटिंग तसेच सर्वाधिक उत्साहाने साजरा झालेला Box Cricket Dhamall Season-5 असे अनेक उपक्रम यशस्वीरीत्या राबविले गेले. प्रत्येक कार्यक्रमात सदस्यांचा सहभाग आणि उत्साह मनापासून जाणवला.

डिसेंबर महिना आपल्या क्लबकरिता अधिक महत्त्वाचा आहे. येत्या काळात आपण भव्य रक्तदान शिबीर, ज्ञानप्रकाश इंटरॅक्ट डिस्ट्रिक्ट कॉन्फरन्स, नवीन रोटरॅक्ट क्लबची उभारणी, टिफिन रेसिपी स्पर्धा, विद्यापीठ मान्यताप्राप्त Peace Studies Course, वाचन कट्ट्याची दशकपूर्ती, IMA सोबत जाहीर व्याख्यान, तसेच अंजनविहिरे गावात विनामूल्य वैद्यकीय तपासणी शिबीर हे उपक्रम हाती घेत आहोत. प्रत्येक कार्यक्रम समाजाप्रती असलेल्या आपल्या बांधिलकीची प्रचिती देणारा आहे.

या महिन्यात आपल्या रोटरी महावाचन अभियानाची रोटरीच्या मॅगझिनमध्ये एका पूर्ण पानाची दखल घेतली गेली, ही अत्यंत गौरवशाली आणि प्रेरणादायी बाब आहे. शिवाय, वाचन कट्टा उपक्रमात प्रांतपाल मा. नाना शेवाळे यांचा प्रत्यक्ष सहभाग हा आपल्यासाठी मोठा मान व प्रोत्साहन देणारा क्षण ठरला.

मित्रांनो, या सर्व उपलब्ध्यांचे मूळ एकच आपला Unite for Good हा कृतीप्रधान मंत्र. आपण सर्व जण एकत्र आलो की कोणताही उपक्रम सहजतेने आणि यशस्वीरीत्या पूर्ण होतो. डिसेंबर महिना संधी, सेवा आणि एकोप्याचा आहे. चला, हाच वेग आणि उत्साह कायम ठेवत आपण सर्व मिळून रोटरीचे कार्य अधिक प्रभावी करू या !

रोटरी सेवेचा आनंद घेऊ या. Unite for Good !

**– रो.गिरीश कुलकर्णी**

# साप्ताहिक सभा

## नोव्हेंबर महिन्यातील साप्ताहिक सभा




* **दि. ७ नोव्हेंबर –** 'वंदे मातरम' या आपल्या राष्ट्रीय गीताला १५० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल राष्ट्रीय युवा योजनेचे वरीष्ठ कार्यकर्ते व उत्कृष्ट वक्ते श्री.नरेंद्र वडगावकर यांचे 'वंदे मातरम सार्ध शति व भारत जोडो' या विषयावर भाषण आयोजित केले होते. सदस्यांची लक्षणीय उपस्थिती होती.

* **दि. १४ नोव्हेंबर –** या सभेत २९ व ३० नोव्हेंबरला बॉक्स क्रिकेट स्पर्धाचे आयोजन आपल्या क्लबच्या सदस्यांसाठी केले. त्याबद्दलची माहिती व खेळाडूंचे लिलाव (Auction) आणि टीम फॉरमेशन करण्यात आले. स्पोर्टस् कमिटी चेअरमन रो.चंदन महाजन, प्रोजेक्ट चेअरमन रो.रितेश जैन, अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी, मा.सचिव रो.सुभाष अमळनेरकर मंच्यावर उपस्थित होते.







* **दि. २१ नोव्हेंबर –** आपल्या क्लबचे वरीष्ठ सदस्य माजी अध्यक्ष रो.डॉ.प्रदीप जोशी यांचे 'फाऊंडेशन' या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान व प्रेझेंटेशन झाले. याचवेळी याच विषयावर सदस्यांसाठी संवाद सचिव रो.पंकज व्यवहारे यांनी एक प्रश्न मंजूषा घेतली आणि उत्तर देणाऱ्याला आकर्षक बक्षिसेही देण्यात आली.

* **दि. ३० नोव्हेंबर –** यावेळी २८/११ ची साप्ताहिक सभा दि. ३०/११ रोजी घेण्यात आली. याच दिवशी बॉक्स क्रिकेट धमाल–५ या स्पर्धेची सांगता झाली आणि विजेत्या व उपविजेत्या संघाला आकर्षक ट्रॉफी प्रदान करण्यात आली. उत्कृष्ट खेळाडूंना सुद्धा आकर्षक बक्षिसे देण्यात आली. विजेता संघ चेन्नई सुपर किंग्स् तर उपविजेता संघ रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू.



# प्रोजेक्ट

## नोव्हेंबर महिन्यातील प्रोजेक्ट




**✻ दि. ९ नोव्हेंबर –** १४ नोव्हेंबरच्या बालदिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब जळगाव आणि व. वा. वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने मुलांसाठी 'वाचन कट्टा' हा उपक्रम घेण्यात आला. यावेळी अनेक लहान मुलांनी त्यांच्या आवडीच्या पुस्तकाचे वाचन केले. मा.सचिव, संवाद सचिव व इतर अनेक रोटरीचे सदस्य यावेळी उपस्थित होते.

**✻ दि. १४ नोव्हेंबर–** आपल्या क्लबच्या लिगल एड कमिटीतर्फे तसेच जळगाव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व एस.एस.मणियार विधी महाविद्यालय यांच्या सहकार्याने जिल्हा न्यायालय परिसरात विविध कायद्यांविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. सदर प्रोजेक्टसाठी रो.ॲड.महेश भोकरीकर यांनी बरेच परिश्रम घेतले. अध्यक्ष, सचिव व अनेक रोटरी सदस्य यावेळी उपस्थित होते.






**✻ दि. १४ नोव्हेंबर –** आपल्या क्लब तर्फे गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात सोसायटी ऑफ ॲनेस्थेशियालॉजिस्ट यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी CPR - Awarness हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. रो.डॉ.सुनील सुर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले.

**✻ दि. १६ नोव्हेंबर–** धानोरा येथे ग्रामीण भागातील नागरिकांसाठी आपल्या क्लब तर्फे भव्य वैद्यकीय शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ७०० हून अधिक ग्रामस्थांनी याचा लाभ घेतला. मेडीकल कमिटीचे चेअरमन पीपी.रो.डॉ.जयंत जहागीरदार व इतर अनेक डॉक्टर्स यांनी सदर कॅम्प यशस्वी करण्यास खूप परिश्रम घेतले. सर्वांचे अभिनंदन.



# प्रोजेक्ट

# नोव्हेंबर महिन्यातील प्रोजेक्ट



✻ **दि. १८ नोव्हेंबर –** आपल्या क्लबच्या सारेगम या संगीत समूहातर्फे शहरातील 'उडान दिव्यांग पुनर्वसन केंद्र' यातील २५ मुलांसाठी 'गीत बहार' हा विविध गीतांचा कार्यक्रम सादर केला. या विशेष मुलांनी त्यावर खूप सुंदर प्रतिसाद दिला. या संस्थेच्या संचालिका यांनी नंतर सर्व सदस्यांना त्यांची संस्था दाखवली व माहिती दिली. या संस्थेला रू. २४,५००/– चा मदत म्हणून धनादेश दिला.

✻ **दि. २० नोव्हेंबर–** जिजामाता माध्यमिक विद्यालयात इंटरॅक्ट क्लब अंतर्गत निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, फोटो क्लिक स्पर्धा अशा विविध स्पर्धांबरोबर पथनाट्य ही आयोजित करण्यात आले होते. पारितोषिक वितरण रो.सुभाष अमळनेरकर, रो.पंकज व्यवहारे, रो.सुबोध सराफ, सौ.आदिती कुलकर्णी यांच्या हस्ते झाले.






✻ **दि. २३ नोव्हेंबर–** वाचन कट्टा– या दिवशी रोटरी क्लबच्या हॉल मध्ये सर्वांसाठी 'वाचन कट्टा' या उपक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी विषय होता, 'प्रवास वर्णन' या दिवशी आपले डी.जी.रो.ज्ञानेश्वर (नाना) शेवाळे हेही उपस्थित होते आणि त्यांनी ही आपल्या आवडीच्या एका पुस्तकाचे वाचन केले.

✻ **दि. २८ नोव्हेंबर–** जिजामाता माध्यमिक विद्यालयात रोटरी क्लब तर्फे ७x७x७ प्रोजेक्ट घेण्यात आला. यावेळी प्रमुख वक्त्या रो.डॉ.शमा सराफ यांनी 'भावनिक बुद्धिमत्ता' या विषयावर विचार मांडले व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे म्हणून रो.सुबोध सराफ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंटरॅक्ट क्लब सदस्य कु.यशस्वरी चव्हाण तर आभार प्रदर्शन कु.दुर्गेश मराठे यांनी केले.



रोटरी मंथ निमित्ताने

# डेसीग्नेटेड मंथ- डिसिज प्रिव्हेन्शन व ट्रिटमेंट

पी.पी.रो.डॉ.प्रदीप जोशी



जग अधिक चांगले करणे, जगातील सर्व लोकांचे राहणीमान सुधारणे हे रोटरीचे उद्दिष्ट आहे. रोगराई करोडो लोकांना काम व आरोग्य या पासून वंचित करते आणि गरीबरेषेखाली त्यांना ढकलते, साहजिकच त्यांच्या जीवनमानावर त्याचा विपरीत परिणाम होतो. यासाठीच रोग प्रतिबंध व उपचार हा रोटरी फाउंडेशनचा महत्त्वाचा फोकस एरिया आहे. याचे महत्व अधोरेखित करण्यासाठी रोटरी डिसेंबर महिना डीसिज प्रिव्हेन्शन व ट्रिटमेंट म्हणून साजरा करीत असते. आरोग्याची समस्या जगभर आहे. विकसनशील देशात अजूनही संसर्गजन्य आजार मुबलक आहेत. जसे क्षय रोग, टायफॉईड, मलेरिया, डेंग्यू, गोवर तर विकसित देशात नॉनकम्युनिकेबल रोगांची चलती आहे , जसे बी पी, मधुमेह, हृदयरोग, कॅन्सर सारखे. त्यामुळे जगभरात आपल्याला काम करण्याची गरज आहेच. वैद्यकीय क्षेत्रात प्रिव्हेन्शनचे तीन टप्पे मानले जातात. प्राथमिक, दुय्यम आणि तृतीय. प्राथमिक टप्प्यात आजार होऊच नये म्हणून काम करायचे असते. यासाठी शक्य त्या आजारांवर लसीकरण हा उपाय असतो. लसीकरणावर रोटरी भरपूर काम करीत आहे. पोलीओप्लस हा खूप मोठा महत्वाकांक्षी कार्यक्रम आपण जवळ जवळ पूर्ण यशस्वी करत आलो आहोतच. शिवाय गोवर, हिपॅटायटीस, सर्व्हायकल कॅन्सर यासाठीही आपण लसीकरण नियमितपणे देत असतो. लसीकरणाव्यतिरीक्त आजारांविषयी जनजागृती करणे हेसुद्धा महत्त्वाचे काम आहे.विशेषतः रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार याविषयी आजाराची माहिती देऊन आजार होऊ नये म्हणून घ्यायची खबरदारी लोकांपर्यंत पोहोचवणे हेही काम महत्त्वाचे आहे आणि रोटरी विविध उपक्रमांद्वारे ते करतच असते. त्यामुळे आजार होऊच नयेत यासाठी सर्वसामान्यांना खूप मदत होऊ शकते. दुय्यम म्हणजे सेकंडरी प्रतिबंधात आजाराचे लवकरात लवकर निदान करून उपचार सुरू करणे हे उद्दिष्ट असते. यातही रोटरी मोठे काम करत असते. आपण रोगनिदान शिबिरे घेतो. शाळेत विद्यार्थ्यांची तपासणी घेत असतो, ब्लडप्रेशर, ब्लड शुगर तपासणी तसेच डोळे तपासणी, ईसीजी तपासणी या सारख्या शिबिरातून रोगांचे वेळीच निदान होते व अनेकांना वेळीच उपचार, शस्त्रक्रिया करून त्यांच्या जीवनात सुधारणा करता येते. तृतीय टप्पा म्हणजे पुनर्वसनाचा. आजारी व्यक्तीचे उपचारानंतरचे आयुष्य अधिकाधिक नॉर्मल असावे यासाठी यात प्रयत्न अपेक्षित असतात. कुष्ठरोग्यांचे पुनर्वसन, मतीमंद व मानसिक रुग्णांना परत जास्तीत जास्त नॉर्मल आयुष्याच्या प्रवाहात आणणे, ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्यात परत आनंद व उत्साह आणण्याचा प्रयत्न करणे यातील बऱ्याच गोष्टी आपण रोटरीच्या माध्यमातून करतच असतो. मानसिक आजाराबाबतही आपल्याला हे तिन्ही टप्पे आचरणात आणता येतात. मानसिक आजारावर लसीकरण नसले तरी मानसिक आजाराबाबतीत जनजागृती करणे, ते लवकर कसे ओळखावे व त्यावर योग उपचार कोणते व कसे करावे याबद्दल प्रबोधन करता येंऊ शकते. यावरही आपल्याला काही काम करता येऊ शकेल.

## उगवते तारे

# धैर्यशील समीर

रो.ॲन.ज्योती शिंदाडकर



माझा मुलगा डॉ. समीर याने नुकतीच फिलिपिन्स ची राजधानी मनीला येथून एमबीबीएस पदवी संपादन केली आहे. ही आमच्यासाठी अत्यंत अभिमानाची, आनंदाची बाब आहे. लहानपणापासूनच डॉक्टर होण्याचे त्याचे स्वप्न होते.

बारावीनंतर कुठे ॲडमिशन घ्यायची याचा विचार चालू असताना आम्हाला फिलिपिन्स देशातील AMA मेडिकल कॉलेज विषयी कळाले. हा देश शिक्षण संस्कृती आणि वैद्यक शास्त्र या क्षेत्रात अत्यंत प्रगत आहे. या देशातील वातावरण हे मुंबई सारखे आहे. भारतातील आढळणारे बहुतांश आजार डेंग्यू ,टायफाईड, मलेरिया ,डायबिटीस तेथेही समान असल्यामुळे विद्यार्थ्यांना व्यवहारिक अनुभवाची उत्तम संधी मिळते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे तेथील भाषा इंग्रजी आहे त्यामुळे शिक्षण आणि संवादासाठी सुलभ होती. येथे जेवण सुद्धा भारतीय मिळते. शिस्त आणि नियमितता हे कॉलेजचे वैशिष्ट्य .तिथे बरीच भारतीय मुलं शिक्षणासाठी जातात.

साधारणतः मुलं परदेशात पोस्ट ग्रॅज्युएशन साठी जातात परंतु याला ग्रॅज्युएशनसाठी पाठवायचे धाडस होत नव्हते. आम्ही सर्व त्याला सांगितल्यावर त्याची जाण्याची तयारी बघून आम्ही तेथे ॲडमिशन घेतली.

या प्रवासात त्याने अनेक आव्हानांचा सामना केला. परदेशातील शिक्षण, नवीन वातावरण,संस्कृती आणि घरापासून दूर राहण्याचे दुःख यावर त्याने धैर्याने मात केली. प्रत्येक टप्प्यावर त्याने आत्मविश्वास परिश्रम आणि संयम याचा सुंदर संगम साधला या सगळ्या प्रवासात देवावर आणि स्वतःवर ठेवलेला विश्वास हे त्याच्या यशाचे खरे गमक आहे.

आम्ही त्याच्या पदवीदान समारंभासाठी फिलिपिन्सला गेलो तेथे आई म्हणून हा क्षण माझ्यासाठी अत्यंत भावनिक आणि समाधान देणारा होता म्हणजे या देशातील शिक्षण पद्धती अत्यंत प्रायोगिक आणि संशोधना निष्ठीत होती. प्रोफेसर सहकार्यशील असून विद्यार्थ्यांना मानवतेसाठी डॉक्टर बनवण्याचा प्रयत्न करतात हे विशेष भावले. या देशातील लोकांचा येणारा रोजचा व्यवहार्य संबंध जिव्हाळ्याचा आणि वडीलधाऱ्यांचा सन्मान या मूल्यांनी आम्हाला परकेपणा जाणवू दिला नाही. भारतीय विद्यार्थ्यांसाठी स्थानिक लोकांनी दाखवलेले प्रेम आणि आदर पाहून आमच्या मनात या देशाबद्दल अपार कृतज्ञता निर्माण झाली.

आज समीरने प्राप्त केलेले हे यश आमच्या संपूर्ण परिवाराच्या तसेच आमच्या समाजाच्या अभिमानाचा विषय आहे. यात त्याचे वडील डॉ.सतिश शिंदाडकर यांचा सिंहाचा वाटा आहे. माझी एकच मनापासून इच्छा आहे की तो आपल्या ज्ञान आणि कौशल्य मानवतेच्या सेवेसाठी, रुग्णांच्या वेदना कमी करण्यासाठी, निरोगी समाज घडवण्यासाठी आणि वैद्यक सेवेच्या क्षेत्रात आपला ठसा उमटण्यासाठी प्रयत्नशील राहो. त्याला उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि यश लाभो हीच आई म्हणून माझी देवाकडे मनःपूर्वक प्रार्थना.

## बॉलीवुड टाईम्स

### किनारा....

रो.सुबोध सराफ



''दिन ढले जहा रात पास हो,
ज़िंदगी लो ऊँची कर चलो......
याद आये गर कही, दिल उदास हो मेरी
आवाज ही पहचान है गर याद रहे..... ओ ओ
नाम गु म जायेगा चेहरा ये बदल जायेगा....
मेरी आवाज ही पहचान है गर याद रहे ..'

'आदरणीय गुलझार साहेबांच्या समर्थ लेखणीतून झिरपलेले हे शब्द जेव्हा राहुल देव बर्मन हा 'वल्ली ' संगीतकार ते सूर संगीतमय करतो तेव्हा ते थेट तुमच्या हृदयाला जाऊन भिडतात ते कायमचेच... एकाहून एक सरस गाणी.... अर्थपूर्ण 'किनारा' हा चित्रपट १९७७ साली प्रदर्शित झाला... कलाकार जितेंद्र... हेमा मालिनी.... धर्मेंद्र...... श्रीराम लागू आणि दिना पाठक..... एकाहुन एक मातब्बर नट मंडळी ...., आणि दिग्दर्शक त्याहून सरस.... हो जितेंद्र, धर्मेंद्र आणि हेमा यांच्या कडून मोठ्या संयमाने त्यांनी फारच छान काम करवून घेतले या सिनेमा मध्ये..... श्रीराम लागू आणि दिना पाठक यांच्या बद्दल प्रश्नच नाही..... हा सिनेमा 'क्रिटीक्स' आणि प्रेक्षकांना सुद्धा पसंतीस पडला.... भूपेन्दर ची दोन गाणी 'कोई नही है कही....''एक ही ख्वाब बार बार देखा है मैंने....'' लता दीदी आणि भूपेंदर चे अजुन एक गाणे 'मीठे बोल बोले बोले पायलिया छूम छनन बोले झनक झन बोले...' लता दीदीचे एक खास आर्त स्वरात गायलेले' अब के न सावन बरसे अब के बरस तो बरसेगी अखियां....' ही सर्व गाणी तुम्हाला 'अंतर्मुख करतात.... कायम कुठेही केव्हाही ऐकलीत तरी क्षण भर मन सुन्न होत... 'ग्रेट किशोर चे एकच गाणे यात आहे 'जाने क्या सोच कर नाही गुजरा...., एक पल रात भर न ही गुजरा....' किशोर चा खास आवाज या गाण्यात लागला आहे 'पंचम' चा अजून एक अविस्मरणीय चित्रपट . 'तरल' संगीत या सिनेमास त्यांनी दिले आहे. ... गुलझार साहेबांनी या कथेचे सोनेच केले आहे एक 'अप्रतिम' चित्रपट त्यांच्या मुशीतून तयार झाला आणि जितेंद्र, धर्मेंद्र, हेमा यांच्या खात्यात क्लासिक चित्रपट जमा झाला . 'किनारा '

## गोल्डन वर्डस्

### Book Review

रो.पंकज व्यवहारे



***Title: The Miracle Morning***
***Author: Hal Elrod***
***Type: Non-fiction***
***Published in: 2012***

***Best Quotes in the book: The moment you accept total responsibility for everything in your life is the moment you claim the power to change anything in your life.***

***Review:***

What if you could miraculously wake up tomorrow and any - or every area of your life was transformed? What would be different? Would you be happier? Healthier? More successful? In better shape? Would you have more energy? Less Stress? More Money? Better relationships? Which of your problems would be solved? What if I told you that there is a "not-so-obvious" secret that is guaranteed to transform any - or literally every area of your life, faster than you ever thought possible? What if I told you it would only take 6 minutes a day?

Enter The Miracle Morning. What's now being practiced by thousands of people around the world could perhaps be the simplest approach to creating the life you've always wanted.

The acronym Hal created to remember his practice better: SAVERS. This will definitely alter your morning into Miracle. These six daily practices will fuel your efforts to create and sustain positive change in your life.

***About the Author***

Hal Elrod born on May 30, 1979 is an American author, keynote speaker and success coach. He is the author of the bestselling book The Miracle Morning.

# रोटरी क्लब जळगाव तर्फे वैद्यकीय शिबिरात ७०० रूग्णांची तपासणी

रविवार, दि. १६ नोव्हेंबर २०२५ रोजी धानोरा येथे रोटरी क्लब जळगाव मार्फत येथील ग्रामस्थांसाठी रोगनिदान व उपचार शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आर.सी.सी. क्लब, धानोरा यांच्या सहकार्याने भरवलेल्या या शिबिरात पंचक्रोशीतील सुमारे ७०० पेक्षा अधिक गरीब रूग्णांची तपासणी करण्यात आली.

याप्रसंगी रोटरी क्लबचे अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी, मानद सचिव रो.सुभाष अमळनेरकर, संवाद सचिव पंकज व्यवहारे, मेडीकल कमिटी चेअरमन डॉ.जयंत जहागिरदार, प्रकल्प को–चेअरमन रो.डॉ.महेश पाटील यांच्या मार्गदर्शनात शिबिराचे नियोजन करण्यात आले होते. शिबिरास ज्येष्ठ सदस्य रो.प्रेम कोगटा, रो.किशोर मंडोरा, रो.योगेश गांधी, रो.संदीप शर्मा, रो.हेमंत भंगाळे, रो.विजय जोशी, रो.संध्या महाजन, रो.सुबोध सराफ, रो.किशोर जाखेटिया, आर.सी.सी. अध्यक्ष प्रदीप महाजन, सचिव वासुदेव महाजन, प्रमोद झवर, संदीप महाजन, योगेश पाटील, शेखर पाटील, मिलिंद बडगुजर, रेखा महाजन यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

प्रास्तविकात रो.गिरीश कुलकर्णी यांनी गावातील सामाजिक योगदानाचा उल्लेख करून दरवर्षी गावातील गरजूंसाठी आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी म्हणून हे शिबिर घेतल्याचे स्पष्ट केले.

या शिबिरात डोळे तपासणी, स्त्रीरोग तपासणी, हाडांची तपासणी, लहान मुलांची तपासणी, कॅन्सर रोग निदान व (स्किन) कातडीचे रोग तपासणी इ. तपासण्या खालील तज्ञ डॉक्टरांकडून करण्यात आल्या.

डॉ.तुषार फिरके, डॉ.उदय चौधरी, डॉ.पराग जहागीरदार, डॉ.लिना बडगुजर, डॉ.प्रांजली जयस्वाल, डॉ.अंजली नेवे, डॉ.हेमंत बाविस्कर, डॉ.काजल फिरके, डॉ.निकुंज गुजराथी, डॉ.अनुपम सिंग, डॉ.मृणाल पाटील, डॉ.भाग्यश्री साळवी, डॉ.गौरव, दामोदर चौधरी, लक्ष्मण जोशी, डॉ.नेहा काबरा, डॉ.साधना पाटील, डॉ.चेतना राणे, डॉ.रोहन बोरोले. नोंदणीचे काम रोटरी सदस्य रो.रितेश जैन, रो.कमलेश चांदवाणी, रो.विश्वजीत बऱ्हाटे, रो.निपुण बजाज. औषधी वाटप व्यवस्थापन रो.विजय जोशी, जयेश जोशी यांनी केले. रो.श्याम अग्रवाल, रो.राकेश चव्हाण, उल्हास सुतार, मच्छिंद्र महाजन, डिगंबर सोनवणे, नंदुलाल महाजन, उमाकांत पाटील, गणेश, गौतम पाटील, अभय महाजन, इशांत पाटील यांच्यासह इंटरॅक्ट क्लब सदस्यांनी खूप सहकार्य केले.

रूग्णांची विनामूल्य वैद्यकीय तपासणी करून गरजूंना मोफत चष्मे सुद्धा दिले. ज्यांना मोतीबिंदूचा त्रास आहे. अशा ५० रूग्णांची मोतीबिंदूंची शस्त्रक्रिया डॉ.तुषार फिरके व डॉ.हेमंत बाविस्कर यांनी लगेच पुढील आठवड्यात केली. रूग्णांचे चेहऱ्यावरील समाधान व हास्य हेच खरे या उपक्रमाचे यश होय.











## यश, निवड, अभिनंदन



* रो.गिरीश कुलकर्णी यांचे पुढील वर्षासाठी (रोटरी वर्ष २०२६-२७) GML चे Chief Editor म्हणून निवड झाल्याबद्दल अभिनंदन.
* रो.ॲड.सागर चित्रे यांचे पुढील रोटरी वर्षासाठी (रोटरी वर्ष २०२६-२७), असिस्टंट गव्हर्नर म्हणून निवड झाली. तसेच रेडक्रॉस मध्ये मा.जिल्हाधिकारी श्री.रोहन घुगे यांनी त्यांची डायरेक्टर (लिगल सेल) म्हणून नियुक्ती केली. अभिनंदन !
* मृण्मयी कुलकर्णी- रो.गिरीश कुलकर्णी यांची कन्या कु.मृण्मयी हिने 'मीरा' या कथक नृत्य प्रयोगात मुंबईतील प्रसिद्ध केंद्र नीता मुकेश अंबानी कल्चरल सेंटर, मुंबई (NMACC) येथे उत्कृष्ट नृत्य सादर करून सगळ्यांची प्रशंसा मिळवली. अभिनंदन.
* पुष्कर यावलकर - रो.राजेश यावलकर यांचे सुपुत्र पुष्कर याने कार्डिफ मेट्रोपॉलिटन युनिव्हर्सिटी (यु.के.) येथून एम.बी.ए. मार्केटींग केले व नंतर स्वत:च्या स्टार्टअप कंपनी 'इनाटो' तर्फे गायीच्या शेणापासून इको फ्रेन्डली पेन्ट बनवला आहे. अभिनंदन.
* रो.रविंद्र पाटील (CA) यांची आंध्र प्रदेशातील 'मदनापल्ले इन्स्टिट्युट ऑफ टेक्नोलॉजी आणि सायन्स' च्या वित्त समितीवर सदस्य पदी निवड झाली. अभिनंदन.
* रो.ॲड.हेमंत भंगाळे यांची नोटरी अभियोक्ता असोसिएशन, जळगावच्या पदाधिकारी पदी नियुक्ती झाली. अभिनंदन!
* रो.डॉ.शमा सुबोध सराफ यांची जळगाव जिल्ह्याचे कलेक्टर श्री.रोहन घुगे यांनी जाहीर केलेल्या रेडक्रॉस पदाधिकाऱ्यांच्या नूतन कार्यकारिणीमध्ये युथ आणि ज्युनिअर रेडक्रॉस चेअरपर्सन म्हणून स्तुत्य निवड. अभिनंदन!

## श्रद्धांजली



**दि.२०/११/२०२५ रोजी रो.डॉ.ज्ञानेश पाटील यांचे वडील श्री.दत्तात्रय घन:श्याम पाटील यांच दु:खद निधन झाले. रोटरी क्लब जळगाव तर्फे त्यांना विनम्र श्रद्धांजली.**